पुण शहरातील

श्रीमंत बाजीराव पेशवे यांनीं बांधिलेल्या

प्रसिद्ध

# विश्रामबागवाड्याचा इतिहास

अ.क्र. १९५०
म.ग्रं.सं. पुणे
विषय : इतिहास
सं. क्र. : ६६५

—: लेखक व प्रकाशक :—

गुरुजी गणेश त्र्यंबक बापट,

एम्. ए., ( मुंबई युनिव्हर्सिटी ), एस्. टी. सी.

(सदरहू पुस्तकासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपणांकडे राखून ठेविले आहेत.)

REFBK-0007467

[illegible] सहा आणे [इ. स. १९५०

पुणें शहरांतील

श्रीमंत बाजीराव पेशवे यांनीं बांधिलेल्या

प्रसिद्ध

# विश्रामबागवाड्याचा इतिहास

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २०८९८ वि: [illegible]
क्रमांक [illegible] नोंः दिः २०/१२/८६

—: लेखक व प्रकाशक :—

गुरुजी गणेश त्र्यंबक बापट,
एम्. ए., (मुंबई युनिव्हर्सिटी), एस्. टी. सी.,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
[illegible]

(सदरहु पुस्तकासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपणांकडे राखून ठेविले आहेत.)

REFBK-0007467

प्रथमावृत्ति] किंमत सहा आणे [इ. स. १९५०

# सोन्याचे वेंचक कण

१. पुण्याचे म्युनिसिपल कमिशनर काय म्हणतात ?
२. लेखकास स्फूर्ति केव्हां झाली ?
३. विष्णुशास्त्री बापुशास्त्री बापट कोण ?
४. विश्रामबागवाडा केव्हां बांधला ? खर्च किती आला ?
५. पुष्करणीचा रम्य देखावा.
६. आपटेशास्त्र्यावर शेणमार.
७. लबाड व खोटे बोलणारे विद्यार्थी.
८. शेलापागोटें बक्षीस.
९. पांच लाखांची दक्षिणा.
१०. गोरा इंग्रज अधिकारी व शास्त्री-पंडित यांत उडालेला खटका.
११. गोऱ्यासाहेबाच्या हातांतून दक्षिणा मिळाल्यावर आंघोळ.
१२. गोरे इंग्रज अधिकारी पायांतील बूट काढून व दाराआड डोकावून वेदघोष ऐकतात.
१३. पुण्याचे गोपाळ हरि देशमुख यांची शास्त्राध्ययनाविरुद्ध कोल्हेकुई.
१४. “ भाऊदाजी ” डॉक्टर शस्त्रक्रिया शिकवितात.
१५. लघुचिंतामणी-मिताक्षरी-मनोरमा-किरात-माधव निदान-गागादेशी व लीलावती यांचा अभ्यास.

मुद्रक : न. वि. सरदेशपांडे, आदर्श मुद्रणालय, ३९५।५ सदाशिव पेठ, पुणें २.

सदरहु पुस्तकासंबंधीं

## एस्. जी. बर्वे, आय्. सी. एस्.

## म्युनिसिपल कमिशनर, पुणें, यांचें मत :–

......" विश्रामबाग वाड्यासंबंधीं तुमचें हस्तलिखित मी उत्सुकतेनें वाचलें. सर्वच लिखाण मनोरंजक आहे."......

पुणें नगरपालिका (विश्रामबागवाडा)
ता. १५ डिसेंबर, १९४९

सही—एस्. जी. बर्वे

# विष्णुशास्त्री बापुशास्त्री बापट यांच्या घरा—

## वंशावळी (कामापुरती)

- बल्लाळ
  - बापुशास्त्री [ जन्म इ. स. १७६५; मृत्यु इ. स. १८३५ ]
    - विष्णुशास्त्री [ जन्म इ. स. १८०४; मृत्यु इ. स. १८६५ ]
      - नारायण [ जन्म इ. स. १८१२; मृत्यु इ. स. १८९७ ]
        - बाळाजी ( वडिलांच्या हयातींत वारले.)
      - त्र्यंबक [ जन्म इ. स. १८३९ मृत्यु इ. स. १९०४ ]
        - गणेश [ जन्म २५ मार्च, इ. स. १८९४ ]

७४६७

# संस्कृत कॉलेजचे प्रिन्सिपल्स

१ **राघवाचार्य** रामानुज, इ. स. १८२१ ते १८३८

२ ॲक्टिंग प्रिन्सिपल इ. स. १८३५ **नरसिंहाचार्य** ( राघवाचार्य चिरंजीव ), वडील रजेवर गेल्यामुळें.

३ **अनंताचार्य**, ॲक्टिंग प्रिन्सिपल, इ. स. १८३६ राघवाचार्य दुसऱ्यांदा रजेवर गेले त्या वेळीं.

४ इ. स. १८३७ **नारायणाचार्य**, ॲक्टिंग प्रिन्सिपल.

५ **विष्णुशास्त्री बापट**, ॲक्टिंग प्रिन्सिपल ( राघवाचार्यांच्या मृत्यूनंतर ), डिसेंबर, सन १८३८ ते १९ जुलै, इ. स. १८३९ पर्यंत.

६ **मोरेश्वरशास्त्री साठे** कायम प्रिन्सिपल, २४ सप्टेंबर इ. स. १८३९ ते १८५२. ते अलंकाराचे प्रोफेसर होते. त्यांनीं इ. स. १८५२ मध्यें राजीनामा दिला. कारण, त्यांना मुन्सफची जागा सुरतेस मिळाली. संस्कृतचे प्रोफेसर म्हणून नारायण शास्त्री अभ्यंकर यांची नेमणूक झाली.

७ **कँडीसाहेब** इ. स. १८५३ पासून पुढें इ. स. १८६२ पर्यंत; त्यांचा मासिक पगार रुपये २०० + १३३ = ३३३ ( इ. स. १८५२ पासून संस्कृत. कॉलेजचें नांव "पूना कॉलेज" असें होतें. तें नांव इ. स. १८६७ पर्यंत चालू होतें. नंतर त्याचें नांव " डेकन कॉलेज " असें ठेविलें.)

८ इ. स. १८६७ त पूना कॉलेजचे प्रिन्सिपल **वर्डसवर्थ** होते.

इ. स. १८६८ त "डेक्कन कॉलेज" बांधण्याचें काम पुरें झालें. त्याला एकूण खर्च रु. २४५९६३ आला. जमशेटजी बाटलीवाला यांनीं रु. १२५००० त्या कामीं दिले होते. हेच पारशी गृहस्थ पहिले सर जमशेटजी जिजिभाई, बॅरोनेट होत. 'पूना कॉलेज'चें रूपांतर 'डेक्कन कॉलेजां'त होऊन कॉलेज तिकडे गेल्यावर " पूना हायस्कूल " म्हणून सरकारी शाळा विश्रामबागवाड्यांत राहिली. ती तेथें पुष्कळ वर्षें होती.

# निवेदन

पुणें शहरांतील सुप्रसिद्ध विश्रामबागवाडा नांवाच्या पेशव्यांच्या राजवाड्यांत पेशवाईचा अंत इ. स. १८१८ त झाल्यावर तीनच वर्षांनीं म्हणजे इ. स. १८२१ त इंग्रज सरकारनें संस्कृत पाठशाळेची ( कॉलेजची ) स्थापना केली. त्या कॉलेजचा प्रिन्सिपल होण्याचा बहुमान आमचे आजोबा कै. विष्णुशास्त्री बापुशास्त्री बापट यांना मिळालेला होता. हल्लीं त्या वाड्यांत पुणें शहर म्युनिसिपालिटीचीं ऑफिसें आहेत. उपरिनिर्दिष्ट संस्कृत कॉलेजचा त्याच्या स्थापनेपासूनचा मनोरंजक व उद्‌बोधक इतिहास, शक्य तर त्या कॉलेजचें रूपांतर पुण्यास डेक्कन कॉलेजमध्यें होईपर्यंतचा इतिहास, परिश्रमपूर्वक लिहून सर्व लोकांच्या वाचनास सादर करावा अशी इच्छा माझे मनांत गेलीं कित्येक वर्षें होती. ती इच्छा आज परमेश्वरकृपेनें सिद्धीस जात आहे.

मुंबई शहरांत शिक्षक म्हणून हायस्कुलांत काम करण्याची संधि मला अव्याहत एकवीस वर्षें मिळाली. या २१ वर्षांच्या दीर्घकालांत व्यवसायांतील कामामुळें पुस्तक तयार करण्यास फुरसत मिळाली नाहीं. तथापि थोडीशी माहिती "टाईम्स ऑफ इंडिया" या इंग्रजी दैनिकांत मी लेखमालेच्या रूपानें प्रसिद्ध करूं लागलों. लेखमालें-तील माझा पहिला लेख ३१ डिसेंबर, १९२७ च्या अंकांत प्रसिद्ध झाला व पुढें आणखी दोन लेख प्रसिद्ध झाले. ते लेख अनेक विद्वान् लोकांस आवडले. सदरहु लेखांत प्रसिद्ध झालेली व न झालेली माहिती बहुसंख्य मराठी वाचक वर्गास सादर करावी या हेतूनें पुस्तकरूपानें आज प्रसिद्ध करीत आहें. ती लहानापासून थोरा-पर्यंत सर्व पेशाच्या व दर्जाच्या स्त्रीपुरुषांस आवडेल अशी फार आशा आहे.

आमचें घराणें मूळपासून शास्त्री पंडितांचें. आमचे पणजे बापूशास्त्री बल्लाळ बापट हे जिल्हा रत्नागिरी, तालुके मालवणमधील नारिंग्रे गांवीं रहाणारे. तेथें मोठ्या बागाईत व शेती जमिनीचे ते मालक होते. नारिंग्र्यास एक संस्कृत पाठशाळा चालविण्याबद्दल त्यांना पेशवे सरकारकडून एक गांव इनाम मिळाला होता, व दरसाल श्रावण महिन्यांत 'दक्षिणा' म्हणून पेशव्यांकडून त्यांना १०० रु रोख मिळत असत. ती दक्षिणा घेण्यासाठीं कोंकणांतून त्यांना पुण्यास यावें लागत असे.

त्यांचे चिरंजीव कै. विष्णुशास्त्री बापट. हे फार विद्वान् होते. त्यांचीं सामा-जिक मतें फार सुधारलेलीं होतीं. पुण्यास "इ. स. १८४० त विधवाविवाहाचा प्रचार त्यांनींच प्रथम जाहीर रीतीनें केला. ते विधवाविवाहाचे आद्य प्रचारक होते. असे विवाह कायदेशीर आहेत, असें ते म्हणत. विष्णु परशराम पंडित यांनीं याच मताचा प्रचार मुंबईस केला, व विद्यासागर पंडित यांनीं इ. स. १८६३ मध्यें कलकत्त्यास केला." पहा :—

हितवादी गोपाळ हरि देशमुखकृत, " ऐतिहासिक लेखसंग्रह,"
भाग ३ पान ७८

( २ ) ग. ह. केळकरकृत " गोपाळ हरि देशमुख यांचें चरित्र.

विष्णुशास्त्री बापटांनीं संस्कृत-मराठी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचे चिरंजीव कै. रावबहादूर नारायण विष्णु बापट व आमचे वडील त्र्यंबक विष्णु बापट. रावबहादूर नारायण विष्णु बापट हे मुंबईस फार वर्षें राहिले होते. ते बेळगांवास, साताऱ्यास व पुण्यास एज्युकेशनल इन्स्पेक्टर होते पुढें ते मुंबई सरकारच्या सेंट्रल बुक डेपोचे क्युरेटर होते. ते सरकारी पेन्शनर होते. त्यांना लेखनाचा नाद फार होता. मुंबईच्या हेमंत व्याख्यानमालेंत ते भाग घेत असत. क्युरेटर असतांना त्यांची मैत्री अनेक विद्वान् लोकांशीं झाली होती. उदाहरणार्थ, न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर व सर फिरोजशहा मेथा. नारायण विष्णु बापटांनीं इंग्लंडचा मराठींत लिहिलेला इतिहास ट्रेनिंग कॉलेजांत टेक्स्ट बुक म्हणून वापरला जात असे. " अर्ली हिस्टरी ऑफ दि डेक्कन " या नांवाचें पुस्तक त्यांनीं लिहिलें व कै. डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांना तें समर्पण केलें. भांडारकरांनीं त्याबद्दल त्यांचे लेखी आभार पत्रद्वारें मानिले; तें पत्र आमच्या संग्रहीं आहे. त्यांनीं १०००० रु. ग्रँट मेडिकल कॉलेज मुंबई, यांस दिले आहेत. त्या रकमेच्या व्याजांतून " रमाबाई बापट " नांवाची शिष्यवृत्ति दरसाल त्या कॉलेजांत शिकणाऱ्या मुलीस दिली जाते. त्याचप्रमाणें माटुंगा, मुंबई येथील " व्ही. जे. टेक्निकल इन्स्टिट्यूटला ३५०० रु. दिले आहेत, त्याच्या व्याजांतून दरसाल त्या इन्स्टिटयूटमध्यें शिकणाऱ्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ति दिली जाते. त्र्यंबक विष्णु बापट हे दौंड व केम येथें स्टेशनमास्तर होते; नंतर खडकवासल्याचें धरण बांधताना तेथें स्टोअरकीपर होते; नंतर इ. स. १८७४ ते इ. स. १८९४ पर्यंत २० वर्षें पुण्यास सरकारी शिक्षणखात्यांत एज्युकेशनल इन्स्पेक्टरच्या ऑफिसांत हेडक्लार्क व अधून मधून पर्सनल असिस्टंट होते, व इ. स. १८९४ मध्यें त्यांनीं पेन्शन घेतलें. त्यांनीं पुण्यास तुळशीबागेच्या मागील भाऊमहाराजांच्या बोळांत असलेलें स्वतःच्या मालकीचें घर गंगाधरशास्त्री दातार यांस दान दिलें.

मलाहि इंग्रजी व मराठी दैनिकांत व मासिकांत लेख लिहिण्याचा फार वर्षांचा सराव आहे. मुंबईच्या टाईम्समध्यें हरएक विषयांवर माझीं पत्रें प्रसिद्ध झालेलीं आहेत. पुण्याला दैनिक ज्ञानप्रकाशांत मी अनेक विषयांवर लेख लिहिलेले आहेत; त्यांपैकीं कांहीं लेख कै. गोपाळ कृष्ण देवधर, सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे प्रमुख, फार बारकाईनें व काळजीपूर्वक वाचीत असत हें त्यांच्या पुढील अनाहूत पत्रावरून स्पष्ट होईल.

सर्व्हंटस ऑफ इंडिया ...
मुंबई, ता. १८ जानेवारी, १९२४

सा. न. वि. वि.

माझी व तुमची प्रत्यक्ष ओळख नाहीं, तथापि आमच्या "दैनिक ज्ञान-प्रकाशां"त जे लेख तुम्ही लिहितां त्यांतील कांहीं मी अत्यंत काळजीपूर्वक वाचतों. त्यावरून मला असें दिसून आलें आहे कीं, तुम्ही सत्याचे चहाते आहांत. तुम्ही सत्यगोष्टींचा अभ्यास करतां. तुमची हरकत नसेल तर मी पुण्यास येईन त्या वेळीं तुमच्याशीं बोलणें चालणें करण्यास व तुम्हांस भेटण्यास मी उत्सुक आहें.

तुमचा,
गोपाळ कृष्ण देवधर

ते पुण्यास आल्यावर त्यांना सेवासदनांत भेटलों, व त्या वेळीं आम्हां दोघांत झालेली मैत्री त्यांच्या मृत्यूपर्यंत दिवसेंदिवस वाढतच गेली.

मी ज्ञानप्रकाशांत अनेक लेख सरळ, सोप्या मराठी भाषेंत लिहिले. त्यांपैकीं कांहींचीं नांवें देत आहें—

१ ग्रीक व रोमन लोकांच्या नगर संस्था
२ स्टॉक एक्सचेंज
३ मध्ययुगीन लोकशाही
४ आधुनिक लोकशाही
५ १२५ वर्षांपूर्वीचा हिंदुस्थान
६ सिंडिकॅलिझम्
७ इंग्लंडच्या मंत्रिमंडळाचें सेक्रेटरीएट
८ सोशॅलिझम्
९ हॉब्स, मॉंटेस्क लॉक व रूसो
१० युरोपच्या मध्ययुगांतील ऐतिहासिक स्त्रिया
११ बुधाचें संक्रमण
१२ प्लेगप्रतिबंधक उपाय
१३ मुलांचें आरोग्य व संततिनियमन
१४ पुण्याच्या नगरपालिकेचा कारभार [ टीकात्मक लेख ]
१५ पुणें शहरांतील पेठांचीं मुसलमानी नांवें
१६ पुण्याचा "शिशुसंगोपन व आरोग्य" आठवडा.
१७ पुण्यास स्त्रियांसाठीं स्वतंत्र व्यायामशाळा असण्याची आवश्यकता.

पुण्यास व मुंबईस मी सार्वजनिक भाषणें केलीं आहेत. मुंबईच्या रेडिओवर भाषणें केलीं आहेत. विद्यासेवक मासिकाच्या तिसऱ्या वर्षाच्या बाराव्या अंकांत "प्राणासंबंधीच्या प्राचीन कल्पना" हा माझा लेख प्रसिद्ध झाला तो अनेक विद्वानांना आवडला. पुण्याच्या "महाराष्ट्र" मासिकाच्या मार्च १९४५ च्या अंकांत "दीर्घ

"...." हा लेख प्रसिद्ध झाला त्याचें अनेकांनीं कौतुक केलें. पुण्याच्या "व्हर्नॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी"चा मी कांहीं वर्षें सभासद होतों. त्या संस्थेकडे परीक्षणार्थ येणाऱ्या कांहीं पुस्तकांचें परीक्षण मी केलेलें आहे. पुण्यास सेवा-सदनांत "बेबी ॲन्ड हेल्थ वीक" झाला त्याच्या पब्लिसिटी कमिटीचा मी सेक्रेटरी होतों.

मी पुण्याच्या पुणें नगर वाचन मंदिराचा ऑनररी सेक्रेटरी होतों. त्या संस्थेचा पंचाहत्तरावा वाढदिवस इ. स. १९२३त कै. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. त्या वेळीं लायब्ररीचा सेक्रेटरी म्हणून मी केलेलें चार पानी छापील भाषण अद्यापहि शेंकडो लोक स्मरतात. मे १९४९ मध्यें त्या वाचनालयाचा शंभरावा वाढदिवस झाला त्या वेळीं मी वाचनालयांत हजर होतों, व श्री. ज. स. करंदीकर यांच्या भाषणानंतर मी पांच मिनिटें बोललों. त्यानंतर वर्गणीदारांचा ७५ व्या वाढदिवशीं काढलेला ग्रुप फोटो, केळकरांचे अस्सल हस्ताक्षर, व मी केलेल्या छापील भाषणाची प्रत वगैरे दाखविली ती पाहून त्यांना फार समाधान वाटलें.

कै. बाळ गंगाधर टिळक व कै. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या आठवणींत माझ्या आठवणी प्रसिद्ध झाल्या आहेत.

मी आतांपर्यंत माझ्या आयुष्यांत पांच संस्थांचे शतसांवत्सरिक उत्सव पाहिले आहेत. या प्रत्येकास मी जातीनें हजर होतों. आत्मारामबुवांचें राममंदिर, ठाकूरद्वार, गिरगांव रस्ता मुंबई, ता. २६ सप्टेंबर, इ. स. १९२८. धि टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई १९३८ इसवी. पुणें ज्ञानप्रकाश वर्तमानपत्र, १९४९ इसवी. पुणें नगर वाचन मंदिर मे १९४९ इसवी. ग्रँट मेडिकल कॉलेज, भायखळा, मुंबई, १९४५ इ.

असो. वरील माहिती दिली ती आत्मस्तुति करण्याच्या भावनेनें किंवा वंशजांचा बडिजाव करण्याच्या इच्छेनें दिलेली नाहीं हें मी अत्यंत नम्रतापूर्वक वाचकांच्या नजरेस आणूं इच्छितों. माझी अल्पसेवा वाचकांनीं पहावी, व मला अधिक लिहिण्यास जगन्नायकानें आयुष्य, स्वास्थ्य व उत्साह द्यावा अशी त्याच्या चरणीं अत्यंत नम्रतापूर्वक प्रार्थना करून हें निवेदन पुरें करतों.

२०० ब, शनिवार पेठ,
बापटांचा वाडा, पुणें शहर २,
ता. १ माहे जानेवारी, सन १९५० इ.

गणेश त्र्यंबक बापट,
एम्. ए. ( मुंबई युनिव्हर्सिटी ), एस्. टी. सी.

# विश्रामबागवाडा कोणी बांधला ?

श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब पेशवे यांनीं हा वाडा १४५ वर्षांपूर्वी बांधला. सदाशिव पेठेंत ज्या ठिकाणीं तो बांधलेला आहे त्या ठिकाणीं पूर्वी हरिपंत फडके यांच्या मालकीची मोठी बाग होती. ती जागा बाजीरावानें इ. स. १७९९ मध्यें घेतली, व त्या ठिकाणीं दुमजली तीन चौकी भव्य राजवाडा राहण्यासाठीं बांधला. बांधकामास इ. स. १८०३ मध्यें सुरवात झाली व इ. स. १८०९ मध्यें बांधकाम पुरें झालें. तो बांधण्यास २००५४० रु. खर्च आला. याशिवाय हौद बांधण्यास व मोऱ्या बांधण्यास १४००० रु. लागले. वाड्याच्या बाहेर नैऋत्य दिशेस पुष्करणीचा हौद बांधला त्याला ८५०० रु. खर्च आला. या राजवाड्याची लांबी २६० फूट व रुंदी ९० फूट आहे. रुंदीचा आंकडा एका पुस्तकांत चुकीनें ८१५ फूट दिला आहे. ह्या वाड्याचा उपभोग बाजीरावानें फक्त ८ वर्षें घेतला. वाड्याच्या बंदोबस्तासाठीं पहारा ठेविलेला होता, त्याप्रीत्यर्थ मासिक खर्च ४०० रु. येत असे. नाना फडणीसांचे हौदांतून या राजवाड्यांत पाणी आणण्यासाठीं मोऱ्या, नळ वगैरे बांधण्यास ५००० रु. नारोपंत दातार यांस दिले होते. पुष्करणीवर द्राक्षाच्या वेलीचा मंडप होता. पुष्करणीवर स्नानसंध्येस पुष्कळ ब्राह्मण जात असत, व एकंदर देखावा रम्य दिसत असे. ब्रिटिशांनीं पुणें शहर जिंकल्यावर, म्हणजे इ. स. १८१८ त पेशवाईचा अंत झाल्यावर, त्या वाड्यास दोन वर्षें कुलूप होतें.

इ. स. १८७९ त पेशव्यांच्या बुधवार वाड्यास एका दुष्ट मनुष्यानें आग लावली. तो वाडा जळत असतां त्याच रात्रीं विश्रामबागवाड्यास कोणीं तरी आग लावली. या आगींत विश्रामबागवाड्यांतील पुढल्या दोन चौकांतील भाग जळून गेला. आग विझविण्याचा कसून प्रयत्न करण्यांत आला व त्यामुळें वाड्याचा कांहीं भाग बचावला. पुढें नागरिकांनीं वर्गणी गोळा करून व म्युनिसिपालिटीच्या साह्यानें वाडा मूळ स्वरूपांत होता तसा दुरुस्त करण्यांत आला. पुणें नगरपालिकेनें तो अलीकडे सरकारकडून विकत घेतला. त्याच वाड्यांत पुणें नगरपालिकेच्या कचेऱ्या हल्लीं आहेत.

विश्रामबागवाड्यास दोन वर्षें कुलूप होतें असें वर म्हटलें आहे. तें कुलूप. इ. स. १८२१ त काढून त्या वाड्यांत ईस्ट इंडिया कंपनी सरकारनें एका संस्कृत. कॉलेजची स्थापना केली. त्या कॉलेजचा थोडक्यांत इतिहास पुढीलप्रमाणें आहे:—

# संस्कृत कॉलेजची कल्पना कोणी काढली ?

पुण्यास पेशवाईचा अंत इ. स. १८१८ त झाल्यावर दोन वर्षांनीं, म्हणजे इ. स. १८२० मध्यें, डेक्कनचे कमिशनर चॅपलिन यांच्या डोक्यांत पुण्यास एक हिंदु कॉलेज स्थापण्याची कल्पना प्रथम आली. ता. ४ नोव्हेंबर इ. स. १८२० रोजीं सदरहु कल्पनेची रूपरेषा एका पत्रांत त्यांनीं मुंबई सरकारकडे पाठविली. वेदविद्येचा अभ्यास करणें, व त्याला उत्तेजन देणें, ही गोष्ट त्यांत प्रामुख्यानें दिसत होती. ज्या विद्यार्थ्यानें कोणत्याहि एका शास्त्राचा अभ्यास केलेला असेल अश विद्यार्थ्याला उपरिनिर्दिष्ट कॉलेजांत प्रवेश मिळावा अशी व्यवस्था करण्यांत आली होती

मुंबई सरकारला वरील कल्पना पसंत पडली, व ता. ६ आक्टोबर इ. स १८२१ रोजीं, दसऱ्याच्या सुमुहूर्तावर "विश्रामबाग" राजवाड्यांत संस्कृत कॉलेजची स्थापना करण्यांत आली. राजवाडयांतील मोठया दिवाणखान्यांत त्या दिवशीं एक दरबार भरविण्यांत आला होता, व पुण्यांतील सर्व ठळक मंडळी तेथें हजर होती. चॅपलिन साहेबानें मुंबई सरकारच्या औदार्याचें महत्त्व जमलेल्या मंडळींस तोंडीं सांगितलें. त्याचें मराठी भाषांतर सर्व लोकांना कळण्यासाठीं वाचून दाखविण्यांत आलें. त्यानंतर ज्या शास्त्री लोकांची सदरहु कॉलेजांत प्रोफेसर म्हणून नेमणूक करण्यांत आली होती त्यांना सन्माननीय पोशाख देण्यांत आले, व दरबार बरखास्त करण्यांत आला. १० ते १८ वर्षांच्या सज्जन ब्राह्मण मुलांस ह्या कॉलेजांत प्रवेश मिळत असे. १० ते १३ वर्षांच्या मुलांस सर्व अभ्यासक्रम दहा वर्षांत पुरा करावा लागत असे, १३ ते १५ वर्षांच्या मुलास तो ९ वर्षांत पुरा करावा लागत असे, व १८ वर्षें वयाच्या मुलांस तो ७ वर्षांत पुरा करावा लागत असे.

राघवाचार्य रामानुज ह्या पंडिताला कॉलेजचा पहिला प्रिन्सिपल होण्याचा मान मिळाला. हल्लीं एखाद्या हायस्कूलच्या प्रमुखाला जें काम करावें लागतें तें सर्व राघवाचार्यांना करावें लागत असे. राघवाचार्य कॉलेजचे प्रिन्सिपल असून न्यायशास्त्राचे प्रोफेसर म्हणून काम करीत असत. त्यांचा पगार दरमहा रु. १५० होता. प्रिन्सिपल म्हणून दरमहा ९० रु. व न्यायशास्त्राचे प्रोफेसर म्हणून दरमहा ६० रु. असे एकुण १५० रुपये. धर्मशास्त्राचे प्रोफेसर मोरेश्वरशास्त्री साठे होते. या प्रोफेसरचा दरमहाचा पगार १०० रु. होता, व ज्योतिषशास्त्राचे प्रोफेसर मोरेश्वरशास्त्री जोशी यांचा पगार दरमहा रु. ८० होता. पगार ट्रेझरींतून मिळत असे. पेशवे सरकारच्या रुपयांत पगार मिळे. म्हणून दरमहा १०० रु. वर ४ रु. हुंडणावळ म्हणून पगारांतून कापून घेतले जात असत. प्रोफेसर लोकांचें म्हणणें असें होतें कीं, ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या रुपयांत पगार देत जावा. सरकारी खजिना दूर अंतरावर गारपीर

येथें होता. दरमहा पगार आणण्यासाठीं प्रोफेसर्स व असिस्टंट प्रा... जावें लागत असे. यांत एक दिवस मोडत असे! इ. स. १८३७'त... लोकांनीं सरकारला विनंति केली कीं, दरमहाचा पगार विश्रामबाग वाड्यांतच मिळावा. संस्कृत कॉलेज स्थापन करण्याचे दोन उद्देश होते–( १ ) हिंदु विद्येच्या उपयुक्त भागांस उत्तेजन देणें व त्यांत सुधारणा करणें व युरोपियन विद्या हिंदुस्थानांतील लोक जितकी शिकण्यास तयार असतील त्या मानानें ती शिकण्याचीं साधनें त्यांना उपलब्ध करून देणें. ( २ ) एक सरकार जाऊन दुसरें सरकार आल्यामुळें ज्या विद्वान् ब्राह्मणांचें अतोनात नुकसान झालें होतें त्यांना आपलेंसें करून घेणें. या ब्राह्मण वर्गाचें वजन सामान्य जनतेच्या आकांक्षा व वागणूक यावर फार असे; म्हणून त्याला आपलासा करून घेणें जरूर होतें.

संस्कृत कॉलेजमध्यें कांहीं प्रमुख गुरु व ८ उपगुरु होते. गुरूंचा पगार प्रत्येकीं दरमहा ८० रु. असे व उपगुरूंचा २० रु. असे. पुढें तो ३० रु. पर्यंत वाढविण्यांत आला. सुरुवातीला कॉलेजांत १०० विद्यार्थी होते. नेमणुका खालीलप्रमाणें होत्याः—( १ ) न्यायशास्त्राचे प्रोफेसर किंवा गुरु ( २ ) धर्मशास्त्र ( ३ ) व्याकरण ( ४ ) ज्योतिष ( ५ ) अलंकार व तद्विषयक वाङ्मय ( ६ ) वैद्यशास्त्र ( ७ ) वेदान्त ( ८ ) यजुर्वेद ( ९ ) ऋग्वेद.

ज्योतिष शास्त्राचा अभ्यास करतांना त्या शास्त्रावरील निव्वळ पुस्तकें वाचून काम भागण्यासारखें नव्हतें. ज्योतिषाचे जे सिद्धांत आहेत त्यावर विशेष जोर देण्यांत आला होता. सुबाजी बापू यानें " Copernican of the Puranic, Siddhantic and Copernican System." या नांवाचें पुस्तक लिहिलें होतें. तें क्रमिक पुस्तक म्हणून विद्यार्थ्यांस वाचावें लागत असे.

शस्त्रक्रियेंत पारंगत असलेला डॉक्टर " भाऊ " यास दरमहा २५ रु. वर शस्त्रक्रिया शिकविण्यासाठीं नेमण्यांत आलें. कोणाही विद्यार्थ्याला एक किंवा त्याहून अधिक विषयांचा अभ्यास करण्यास मुभा होती. फक्त एकच विषय घेणाऱ्यास आपला अभ्यासक्रम ५ वर्षांत पुरा करावा लागत असे. दोन किंवा अधिक विषय घेणाऱ्यास ७ वर्षांची मुदत होती. कॉलेजची विभागणी दहा पाठशाळांत करण्यांत आली होती. प्रत्येक पाठशाळेंत १० विद्यार्थी होते. प्रत्येक पाठशाळेवर एक प्रमुख गुरु व एक उपगुरु नेमलेला होता. कॉलेजचें एक लहानसें पुस्तकालय होतें. कॉलेजांत एक " लिथो प्रेस " ही होता.

कॉलेजचा वर्षारंभ जूनमध्यें असे व वर्षअखेर एप्रिलमध्यें असे. एप्रिलमध्यें वार्षिक परीक्षा घेऊन सुट्टी देण्यांत येत असे. हा क्रम इ. स. १८२१ पासून १८५२ पर्यंत चालू होता. त्या वर्षानंतर, म्हणजे इ. स. १८५३ पासून जानेवारी ते डिसेंबर असें वर्ष धरण्यांत येऊं लागलें. एप्रिल महिन्यांत पुण्यांत उन्हाळा फार

असल्यामुळें वार्षिक परीक्षा थंडीचे दिवसांत घेऊं लागले. पहिली टर्म जानेवारी ते एप्रिल चार महिन्यांची, व दुसरी टर्म जून ते नोव्हेंबर सहा महिन्यांची—एकूण १० महिन्यांचें वर्ष. डिसेंबरमध्यें वार्षिक परीक्षा घेतली जात असे.

कॉलेजमध्यें चांगली शिस्त राखली जात असे. गैरशिस्त वर्तणूक करणाऱ्या विद्यार्थ्यांस कॉलेजांतून हाकून देण्यांत येत असे. उदाहरणार्थ, इ. स. १८३९ त रामभट घुगवे यानें कोठेंतरी चोरी केली होती. ही गोष्ट कॉलेजचे चालकांस कळतांच त्या विद्यार्थ्याला हाकून देण्यांत आलें. त्याच सालीं नारायण पंडित यानें दुसऱ्या एका विद्यार्थ्यावर चोरी केल्याचा आरोप केला. तो आरोप खोटा असल्याचें दिसून आलें. या बाबतींत प्रोफेसरांच्या कमिटीनें चौकशी केली, व नंतर नारायण पंडितास कॉलेजमधून हाकलून दिलें. त्याच सालीं बलदेव पिंप्लसकर या विद्यार्थ्याला कॉलेजांतून काढून टाकलें कारण तो जडबुद्धीचा, आळशी व निष्काळजी होता!

कॉलेजचा सर्व खर्च 'दक्षिणें' तून भागविण्यांत येत असे. 'दक्षिणे' संबंधीं विस्तृत हकीकत पुढें देण्यांत आली आहे.

यजुर्वेद व वेदान्त या विषयांचा अभ्यास केलेले विद्यार्थी सोडून दिल्यास असें दिसून येतें कीं, इ. स. १८२१ ते एप्रिल इ. स. १८४१ पर्यंतच्या कालांत आपलें संपूर्ण शिक्षण संस्कृत कॉलेजांत पूर्ण करून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ११२ होती. या ११२ पैकीं कांहींना वर्षासनें मिळालीं, कांहीं श्रीमंत लोकांचे घरीं शास्त्री म्हणून राहिले, कांहीं संस्कृत कॉलेजांत शिक्षक झाले, कांहीं पाठशाळांत शिक्षक झाले, कांहीं 'पंडित' म्हणून युरोपियनांजवळ व सद्‌गृहस्थांजवळ राहिले, कांहींनीं स्वतःच्या पाठशाळा काढल्या, कांहीं सद्‌गृहस्थांच्या घरीं पुराणिक म्हणून राहिले व कांहीं न्यायगृहांत शास्त्री नेमिले गेले. केवळ वेदान्ती भिक्षा मागून किंवा वेदपठण करून उदरनिर्वाह करूं लागले! पास झालेल्यांपैकीं इंग्रज सरकारचे पदरीं नोकरीस राहणारे फारच थोडे.

साधारणतः कॉलेजच्या पटावर दरसाल १०० विद्यार्थी असावेत असा प्रघात होता. परंतु इ. स. १८३५ त ही संख्या घटली होती. कॉलेज चालकांस घटलेली संख्या भरून काढतांना मुंबई सरकारची नेहमीं आगाऊ परवानगी घ्यावी लागत असे. कॉलेजच्या चालकांस तें आवडत नव्हतें. पुढें इ. स. १८३७ त कँडीसाहेब आला. सं. कॉ. चा सुपरिंटेंडंट नेमल्यावर पुढें सर्व सुरळीत चालू झालें. इ. स. १८३७ त आपला सर्व अभ्यासक्रम आटपून १७ विद्यार्थि कॉलेज सोडून बाहेर पडले. कॉलेज सोडून अशा रीतीनें बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना कांहीं बक्षीस रक्कम देण्यांत येत असे. परंतु अशी बक्षीस रक्कम gratuity देण्यापूर्वी एक परीक्षा घेतली जात असे. या परीक्षेस कॉलेजशीं कसलाहि संबंध नसलेले बाहेरील विद्वान् लोकहि बसत असत. पास होणाऱ्या लोकांची वर्गवारी व बक्षिसें खालीलप्रमाणें :—

१ उत्तम—३० रु. रोख व ३० रु. किंमतीचें एक शेलापागोटें.

२ मध्यम—२० रु. ,, व २० रु. ,, ,, ,,

३ कनिष्ठ—— कांहीं नाहीं................

दरसाल सर्व अभ्यासक्रम पुरा करून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांचे जागीं नव्यांची भरती करण्यांत येई. १८ वर्षांचे वयावर कोणालाहि न घेण्याचा नियम होता तरी वय चोरून कांहीं विद्यार्थी आपला प्रवेश संस्कृत कॉलेजांत करून घेत! ही गोष्ट उघडकीस येतांच त्या विद्यार्थ्यांना हाकून देण्यांत येई. उदाहरणार्थ इ. स. १८३४ त पटावर असलेल्या विद्यार्थ्यांपैकीं १६ विद्यार्थी प्रत्येकीं २५ ते ३० वर्षें वयाचे असावेत असें त्यांच्या चेहऱ्यावरून दिसलें! त्या सर्वांची दरमहा मिळणारी ५ रु. ची सरकारी मदत बंद करण्यांत आली! या सर्व प्रकारावरून "दक्षिणा" वाटणें बंद करावें असें कलेक्टरास वाटलें. त्यासंबंधीं त्यानें रेव्हेन्यू कमिशनरला लिहिलें. शेवटीं असें ठरलें कीं, "दक्षिणा" वांटणें चालू ठेवावें, व ज्या वेळीं रेव्हेन्यू कमिशनर, जुडीशिअल कमिशनर व दक्षिणेंतील सरदारांचे "एजंट" पुण्यास असतील त्या वेळीं त्यांनीं दक्षिणा वाटण्याच्या बाबतींत कलेक्टरशीं सहकार्य करावें. त्याच सालीं, म्हणजे इ. स. १८३४ त कॉलेज व्यवस्थेंत सुधारणा घडवून आणण्याबाबत सरकारनें एक कमिटी नेमिली, व त्या कमिटीच्या रिपोर्टाप्रमाणें सुधारणा करण्यांत आल्या. त्या कमिटीचे खालील सभासद होते:—

१ बापूजी गणेश—हंगामी मामलेदार

२ रामचंद्र शास्त्री—शाळामास्तर

३ आबा गोखले

## आपटेशास्त्री व शेणमार

या कमिटीकडे इ. स. १८३५ त "दक्षिणा" वाटणाऱ्या शास्त्र्यांच्या विरुद्ध तक्रारी करण्यांत आल्या होत्या. "दक्षिणा" वाटपाच्या बाबतींत शास्त्री लोकांत ऐकमत्य नव्हतें. दक्षिणा वाटणाऱ्या कमिटींत सं. कॉ. चे प्रिन्सिपॉल राघवाचार्य होते. इतर सभासद सखारामशास्त्री नगरकर, गोविंदशास्त्री पाध्ये व चिंतामण शास्त्री दीक्षित, आपटे हे होते. इ. स. १८२९ त दीक्षित इतर तीन सभासदांना न विचारतां रु. ३९००० ची वार्षिक दक्षिणा वाटेल तशी आपल्या मनाप्रमाणें वाटूं लागला. दक्षिणा द्यावयाची ती विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पुरा करून सं. कॉ. च्या बाहेर पडल्यावर देत जावी असें तिघां सभासदांचें मत होतें; दीक्षित दरसाल नवीन येणाऱ्या विद्यार्थ्यांना दक्षिणा देऊं लागला! शेवटीं या बाबतींत इ. स. १८३०

...क्टरकडे कॉलेजचे विद्यार्थी व आणखी ५०० सद्गृहस्थ यांनीं तक्रार केली व त्यानें दीक्षिताला पाहिजे तशी "दक्षिणा वाटूं नये" अशी समज दिली. तरी तो ऐकेना !

इ. स. १८३४ त त्यानें अस्पृश्यांपैकीं कनिष्ठ अस्पृश्यास कांहीं एका बाबतींत अनुकूल मतप्रदर्शक सही दिली !

इ. स. १८३४ पूर्वी कांहीं वर्षे पुण्यांत सोनार जातीसंबंधीं कांहीं वाद उत्पन्न झाला होता. त्यांत आपटेशास्त्रीबुवांनीं सोनारांना अनुकूल असें मत कांहीं धर्मतत्त्वांच्या आधारें दिलें होतें त्याबद्दल पुण्यांत पुण्याच्या ब्राह्मणांनीं त्याचेवर शेणमार केला होता ! ( He was pelted with Cow dung by Brahmins. )

हे आपटेशास्त्री वयानें ५२ वर्षांचे होते. त्यांची उंची ५ फूट ६¾ इंच होती. रहाणारे रत्नागिरीचे. वर्ण गोरा. त्यांना सालीना २०० रु. 'दक्षिणा' मिळत असे. इतर वार्षिक उत्पन्न रु. ५०० होतें. डोक्यावरील केस पिकले होते.

इ. स. १८३४ मध्यें नेमलेल्या कमिटीच्या शिफारशीप्रमाणें "दक्षिणा" वांटण्याच्या बाबतींत इ. स. १८३६ त खालील नियम मंजूर करण्यांत आले :—

( १ ) दक्षिणा घेण्यासाठीं सर्व ब्राह्मणांनीं कार्तिक वद्य प्रतिपदा ते मार्गशीर्ष पौर्णिमेपर्यंत पुणें शहरांत यावें. दक्षिणा पुण्याच्या खजिन्यांतून मिळावयाची.

( २ ) दक्षिणा घेणाऱ्या ब्राम्हणाचें वर्णनात्मक सर्टिफिकेट हें सरकारजवळ असलेल्या रजिस्टरशीं तुलना करून पाहण्यांत येईल.

( ३ ) दक्षिणा मिळाल्याची पोंच प्रत्येक ब्राह्मणाकडून घेतली जावी.

( ४ ) ज्याला दक्षिणा मिळावयाची असेल त्या ब्राह्मणानें जातीनें हजर राहिलें पाहिजे. त्याच्यातर्फे येणाऱ्या माणसाला ती मिळणार नाहीं.

( ५ ) बाकीसाठीं हक्क सांगून चालणार नाहीं. बाकी कधींही ठेविली जाणार नाहीं.

( ६ ) "दक्षिणा" ही दानधर्म ह्या स्वरूपाची असल्यामुळें ती मृत ब्राह्मणाच्या वारसास मिळणार नाहीं.

ब्राह्मणानें द्यावयाच्या वर्णनाचा फॉर्म :—

| नांव | उंची फूट इंच | वय | मूळ गांव | हल्लीं वस्ती | वर्ण | वार्षिक दक्षिणा | इतर उत्पन्न | शेरा | ...... |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

पुढें इ. स. १८३७ त कँडीसाहेबाला कॉलेजवर देखरेख करण्यास नेमें, वर त्यानें चिंतामणशास्त्री दीक्षित, आपटे, इंगामी प्रिन्सिपल अनंताचार्य व आणखी दोन शास्त्र्यांना कामावरून दूर केलें. त्या दोघांना थोडेंसें पेन्शन दिलें, परंतु अनंताचार्यांची कॉलेजांत १७ वर्षें नोकरी झाली असतांहि त्यांना कांहीं दिलें नाहीं ! हें झाल्यावर कॉलेजांतील कलह बव्हंशीं मिटले. कांहीं कालानंतर हे तिघे कँडीसाहेबांना भेटले व त्यांनीं आपली चूक कबूल केली.

कँडीसाहेब हे सैनिकहि होते व विद्वान् शास्त्री व लेखकहि होते. ते सैन्यांत कॅप्टन व नंतर मेजर होते. ते २० व्या सैन्यपथकांत होते. इ. स. १८४० त सिंध प्रांतांत लढाई सुरू झाली तेव्हां ईस्ट इंडिया कंपनी सरकारनें त्यांना तिकडे पाठवूं नये कारण त्यांच्या तिकडे जाण्यानें पुण्याच्या संस्कृत कॉलेजचें नुकसान होईल अशा-विषयीं संस्कृत कॉलेजच्या प्रोफेसरांनीं व पुण्यांतील इतर सद्गृहस्थांनीं ता. २२ आक्टोबर, इ. स. १८४० रोजीं सरकारकडे लेखी विनंति केली, ती सरकारनें मान्य केली

---

## विश्रामबागवाड्यांतील गणेशोत्सव

इ. स. १८२२ पासून पुण्याच्या संस्कृत कॉलेजांत खालील धार्मिक उत्सव प्रतिवर्षीं करण्याचा होता :—

( १ ) गणेश–चतुर्थी ( २ ) होळी ( ३ ) व्यासपूजा ( ४ ) दिवाळी. इ. स. १८२२ त ह्या वार्षिक उत्सवांचा एकूण खर्च रु. ७६० झाला, इ. स. १८३७ त रु. ३३५ रु. झाला. हा खर्च सरकार करीत असे. गणेश-चतुर्थीच्या दिवशीं गणेशाची मूर्ति कॉलेजच्या दिवाणखान्यांत बसवीत असत. हा उत्सव दहा दिवस चालत असे व नंतर गणपतीची मूर्ति नदीमध्यें विसर्जन करण्यांत येई. हळूं हळूं सरकारनें या उत्सवांवर होणारा खर्च बंद केला, व अशा रीतीनें बचत केलेली रकम असिस्टंट प्रोफेसरांचा पगार वाढविण्यांत व लहान विद्यार्थ्यांचेसाठीं मराठीचा शिक्षक नेमण्यांत खर्च होऊं लागली.

"दर्पण" नामक वर्तमानपत्रांत ह्याविषयीं जो लेख लिहिण्यांत आला होता त्या लेखानुसार वरील बचत व त्याचा विनियोग सरकारनें केला.

# मजेदार प्रसंग नं. १

इ. स. १८३७ त मुंबईचे गव्हर्नर धि राइट ऑनरेबल सर रॉबर्ट ग्रँन्टसाहेब पुण्याजवळ दापोडी येथें कांहीं दिवस राहिले होते. पुण्याच्या संस्कृत कॉलेजांत सुधारणा घडवून आणण्याच्या बाबतींत मेजर कँडीसाहेब गव्हर्नरसाहेबांना अनेकदां जाऊन भेटले होते. कॉलेजांतील तीन प्रोफेसर्स किंवा शास्त्री फार हट्टी व उद्दाम असत. कँडीसाहेबानें कॉलेजशीं सर्व संबंध सोडून निघून जावें असें त्यांच्या मनांत होतें. ह्या शास्त्र्यांशीं झुंज करावी लागणार हें कँडीसाहेबांना कळून चुकलें होतें. हे तिघे शास्त्री अगदीं क्षुल्लक बाबतींतहि कँडीसाहेबाला विरोध करूं लागले.

एके दिवशीं कॉलेजच्या दिवाणखान्यांत कँडीसाहेबानें एक टेबल पाठवून दिलें. त्या दिवाणखान्यांत सरकारच्या मालकीच्या कांहीं खुर्च्या पूर्वींपासूनच होत्या. त्या खुर्च्यांजवळ हें टेबल ठेविलें होतें. उपरिनिर्दिष्ट तीन शास्त्र्यांनीं दिवाणखान्यांत टेबल ही पाश्चिमात्य वस्तु ठेवण्यास हरकत घेतली. त्यांनीं त्या बाबतींत तक्रार केली. कँडी साहेब लिहितात, " विष्णुशास्त्री बापटांच्या सूचनेवरून मी टेबल दिवाणखान्यांत पाठविलें हें खरें आहे. ती वस्तु उपयुक्त असल्याचें विष्णुशास्त्र्यांचें मत होतें. ही तक्रार करण्यांत कांहींच अर्थ नव्हता. अज्ञानी, धर्मदुराग्रही व भांडखोर वृत्तीचा मनुष्यच अशा प्रकारची तक्रार करील. "

अशा तऱ्हेचे हास्यास्पद प्रसंग उद्भवल्यामुळें सरकारनें त्या तिघांना कामावरून काढून टाकलें व त्यांचे जागीं दुसरे तीन नेमिले हें मागें सांगितलेंच आहे. त्याचा परिणाम चांगला झाला.

कँडीसाहेब म्हणतात, " वाईट बीजाचें निर्मूलन झाल्यावर सर्व शिक्षक वर्ग व विद्यार्थी माझ्याशीं चांगले वागूं लागले. मला भेटण्यास त्यांना पूर्ण मुभा असे, व त्यांची कांहीं तक्रार असेल किंवा त्यांना कांहीं पाहिजे असेल तर तें मागण्यास त्यांना पूर्ण स्वातंत्र्य होतें.

# मजेदार प्रसंग नं. २

वरील तिन्ही शास्त्र्यांचें मत असें होतें कीं, कँडीसाहेबानें संस्कृत कॉलेजला दरसाल एकच भेट द्यावी. कँडीसाहेबास ही गोष्ट कबूल नव्हती. नंतर पुढें वादाचा एक मुद्दा असा निघाला कीं, संस्कृत कॉलेजच्या विद्यार्थ्यांची वेद विषयांत परीक्षा घेण्यास कँडीसाहेबाला परवानगी द्यावी कीं नाहीं. त्या तीन कर्मठ शास्त्र्यांच्या मतें

मुलांनीं गोऱ्या युरोपियनसमोर वेदघोष करणें अगदीं अयोग्य. कँडीसाहेबानें ठ॰. तलें कीं, हिंदुधर्माविरुद्ध मुलांना प्रश्न विचारून त्यांचीं मनें दुखविण्याचें पाप आपण कधींहि करणार नाहीं. तथापि शास्त्र्यांचा हट्ट चालूच राहिला. एके दिवशीं नित्याप्रमाणें कँडीसाहेब कॉलेज तपासणीस गेले. ज्या वर्गांत व्याकरण विषय शिकविला जात होता त्या वर्गांत ते शिरले. विद्यार्थ्यांना त्यांनीं प्रश्न विचारले, व नंतर ते कॉलेजचे हंगामी प्रिन्सिपल नारायणाचार्य शिकवीत होते त्या क्लासांत जाऊं लागले. वर्गांत येऊन मुलांना प्रश्न विचारण्यास नारायणाचार्यांनीं हरकत केली. नंतर ते गोविंदाचार्यांच्या क्लासांत गेले; तेथें त्यांना तोच अनुभव आला ! नंतर ते निळकंठशास्त्र्याच्या क्लासांत गेले; तेथेंहि तोच अनुभव ! नंतर त्यांनीं विष्णुशास्त्री बापटांना व इतर शास्त्र्यांना या बाबतींत विचारलें तेव्हां त्या सर्वांनीं स्पष्ट मत दिलें कीं, वेद पवित्र असल्यामुळें त्यांचें पठण कँडीसाहेबासमोर करतां येणार नाहीं.

## मजेदार प्रसंग नं. ३

परीक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना दक्षिणा साहेबाच्या हातानें देण्याचा प्रघात प्रथमतः होता. साहेबाच्या हातानें मिळालेली दक्षिणा "अशुद्ध" म्हणून घरीं आल्यावर ब्राह्मण स्नान करीत असत ! कॉलेज स्थापन झाल्यावर कांहीं वर्षें युरोपियन साहेब विश्रामबागवाड्यांत बूट काढून भीत भीत जात असत व दूर उभे राहून डोकावून पहात असत !

---

सदरहु कॉलेजवर देखरेख ठेवण्याचें काम प्रथमतः कमिशनरकडे सोपविलेलें होतें. नंतर तें काम कलेक्टर पाहूं लागला. परंतु कलेक्टरला इतर फारच काम पडत असल्यामुळें कॉलेजची देखरेख कॉलेजच्या मुख्य शास्त्र्यांच्या हातांत देण्यांत आली. परंतु हें जबाबदारीचें काम ते निष्काळजीपणें पाहूं लागले. म्हणून कॅप्टन कँडी यास २७ फेब्रुवारी इ. स. १८३७ त त्या कामीं नेमलें. त्यांचा पगार हें काम पहाण्यासाठीं दरमहा रु. ११३ + ६० रु. = १७३ रु. होता. त्यानें कॉलेजांत पुष्कळ सुधारणा घडवून आणल्या. देशी भाषांचा एक शिक्षक नेमण्यांत आला. सरकारी मराठी शाळेंत जे विषय शिकविण्यांत येत ते सर्व विषय शिकविण्याचें काम त्याच्याकडे होतें. असें करणें भाग पडलें, कारण जे विद्यार्थी कॉलेजांतील आपला अभ्यासक्रम पुरा करून बाहेर पडत असत, ते देशभाषेविषयीं तिटकारा दाखवीत. कॉलेजांतील अभ्यासक्रम संपवून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्वान् लोकांत मान मिळत असे. शिवाय कॉलेजच्या अभ्यासक्रमाबरोबरच गौण विषयांचा अभ्यास देशी भाषेंतून केला असल्यामुळें विद्यार्थ्याला जी नोकरी मिळे तींत तो आपलें कर्तव्य नीटपणें पार पाडूं शके. कँडी साहेबानें आणखी एक सुधारणा केली ती अशी कीं, वेदान्त व यजुर्वेद यांच्या अभ्यासक्रमास फाटा देण्यांत आला.

प्रत्येक विद्यार्थ्याला दरमहा ५ रु. मदत म्हणून देण्यांत येत असत. परंतु पुढें ही चाल बंद करण्यांत आली. वार्षिक परीक्षेत दाखविलेल्या गुणावरून ही मदत देण्यांत येऊं लागली. त्यासाठीं विद्यार्थ्यांचें चार क्लासांत वर्गीकरण करण्यांत आलें.

इ. स. १८३८ त ज्योतिष शास्त्राचे प्रोफेसर मासिक पेन्शन २० रु. वर सेवानिवृत्त झाले. त्यांचे जागीं नेमणूक करतांना एक खुली परीक्षा घेण्यांत आली. त्या परीक्षेस ८ विद्यार्थी बसले होते. त्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यास कँडीसाहेबाला खालील परीक्षकांची मदत देण्यांत आली होती.

१ विलकिन्सन–भोपाळ येथील पोलिटिकल एजंट

२ ऑलिवर–गणिताचे प्रोफेसर एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई.

३ इस्डेल–पुण्याच्या सरकारी शाळेचे हेडमास्तर. विलकिन्सननें ज्योतिष सिद्धांतावर ४० प्रश्न विचारले होते. व त्यांचीं लेखी उत्तरें त्यानें बारकाईनें तपासलीं. त्यांत असें दिसून आलें कीं, European system of Astronomy, True System of Geography, Use of globes व Physics in General यांचें ज्ञान त्या विद्यार्थ्यांना यत्किंचितहि नव्हतें ! त्यापैकीं शंकर जोशी नांवाचा एकच विद्यार्थी पास झाला. त्याला अधिक अभ्यासासाठीं मुंबईस पाठविण्यांत आलें. तेथें ऑलिवर साहेब व बाळ गंगाधर शास्त्री यांचे हाताखालीं त्यानें अध्ययन केल्यावर त्याची पुण्याच्या संस्कृत कॉलेजांत नेमणूक करण्यांत आली.

आक्टोबर १८४१ त कॉलेजच्या पटावर ८६+७५ विद्यार्थी होते. ८६ ना सरकारी मदत मिळत असे, व ७५ ना ती मिळत नसे. ज्या विद्यार्थ्यांना मासिक मदत नसे ते विद्यार्थी कॉलेजचा अभ्यासक्रम पुरा करून बाहेर पडत असत त्या वेळीं योग्यतेनुरूप त्यांना ७ रु. पासून २०० रु. पर्यंत रोख बक्षिसें दिलीं जात असत. यांची वर्गवारी खालीलप्रमाणें असे :—

| | |
|---|---|
| १ उत्तम–पहिला वर्ग. | २ मध्यम–पहिला वर्ग. |
| दुसरा वर्ग. | दुसरा वर्ग. |
| तिसरा वर्ग. | तिसरा वर्ग. |

३ कनिष्ठ–पहिला वर्ग<br>दुसरा वर्ग.<br>तिसरा वर्ग.

सरकारी मदत मिळणाऱ्या ८६ विद्यार्थ्यांपैकीं ८० परीक्षेस बसले व उत्तमांत एकूण ३८ पास झाले.

यशस्वी उमेदवारांना शिष्यवृत्त्या, पागोटीं, पुस्तकें व लहान पैशाच्या रकमा देण्यांत येत असत. पागोट्याची किंमत ४ ते ५ रु असे. पुस्तकांची जास्तींत जास्त किंमत १ रु. ६ आण्यापर्यंत असे !

कॉलेजचे प्रिन्सिपल राघवाचार्य इ. स. १८३५ पूर्वी एकदां सात महिन्यांच्या रजा घेऊन " व्यंकोबा " स गेले होते. नंतर १८३५ त ता. ७ सप्टेंबर रोजीं त्यांनीं सरकारला कळविलें कीं, काशीयात्रेस जाण्यासाठीं आपणास रजा मिळावी, व आपल्या जागीं आपल्या चिरंजीवाची--नरसिंहाचार्यांची नेमणूक करावी. रजा मंजूर झाली, परंतु सरकारनें त्यांच्या चिरंजीवाची नेमणूक न करतां अनंताचार्य यांची नेमणूक त्या जागीं केली. राघवाचार्यांच्या मतें अनंताचार्य न्यायशास्त्र शिकविण्यास लायक नव्हते, म्हणून सरकारनें तें काम रघुनाथशास्त्री पुरोहित यांस दिलें. पुढें २३ नोव्हेंबर इ. स. १८३८ रोजीं राघवाचार्य मृत्यू पावले ही बातमी कँडीसाहेबास ते फिरतीवर असतांना नाशिक येथें कळली ! त्यांनीं ४ डिसेंबर १८३८ रोजीं पत्र पाठवून असें कळविलें कीं, विष्णुशास्त्री बापट यांची हंगामी नेमणूक संस्कृत कॉलेजचे प्रिन्सिपल म्हणून करावी, व कॉलेजच्या स्टँडिंग कमिटींत राघवाचार्यांचा मुलगा घ्यावा व त्या कमिटीच्या सरपंचाचें काम रामचंद्रशास्त्री जानवेकर यांनीं पहावें. कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणें व दक्षिणा वाटणें हीं कामें स्टँडिंग कमिटी पहात असे. जानवेकरांच्यापूर्वी कमिटीचे सरपंच राघवाचार्य हेच होते.

कै. राघवाचार्य यांनीं कॉलेजचे पहिले प्रिन्सिपल म्हणून १८ वर्षें काम केलें. विष्णुशास्त्री बापट हे कॉलेजच्या लिथो प्रेसचे सुपरिंटेंडंट म्हणून काम पहात असत. त्यांच्या नंतर इ. स. १८३९ मध्यें परशरामपंत गोडबोले यांना त्या प्रेसचे सुपरिंटेंडंट नेमिलें.

संस्कृत कॉलेजला लागणारीं संस्कृत पुस्तकें छापण्याकरितां व सरकारी मराठी शाळांत लागणारीं मराठी पुस्तकें छापण्याकरितां हा छापखाना इ. स १८३८ पासून वाड्यांत ठेवण्यांत आला. पहिल्या वर्षाच्या छपाईचें अंदाजपत्रक रु. ६९ चें होतें. इ. स. १८३९ त होळीच्या सुटीनंतर मार्च महिन्यांत लिथो प्रेसवर २ महिनेपर्यंत फारसें काम होईना. कारण ते दिवस उन्हाळ्याचे होते. परंतु पुढें दररोज ७०० कॉपीज निघूं लागल्या. लघुहितोपदेशांच्या २००० प्रती छापल्या. इ. स. १८४३ मध्यें ह्या लिथो प्रेसचा खर्च रु. ३५४८ होता.

| | |
|---|---|
| एस्टाब्लिशमेंट | रु. १५४८ |
| स्टेशनरी | रु. २००० |
| एकूण | रु. ३५४८ |

दक्षिणा फंडांतून लिथो प्रेसचा खर्च भागविण्यांत येई.

इ. स. १८३६ त राघवाचार्य रजा घेऊन बनारसला गेले तेव्हां असें ठरलें कीं, रजेच्या पहिल्या तीन महिन्यांत त्यांच्या पगारांत दरमहा $\frac{1}{8}$ कपात करावी व पुढें ते रजेवरून परत येईपर्यंत दरमहा $\frac{1}{2}$ कपात करावी. ही कपात करून बचत केलेला पैसा आपणांस मिळावा असा अर्ज अनंताचार्य व राघवाचार्य या दोघांनीं सरकारकडे केला. तेव्हां असें ठरलें कीं, बचत केलेल्या रकमेपैकीं $\frac{3}{4}$ रकम अनंताचार्य यांना द्यावी व बाकीची $\frac{1}{4}$ राघवाचार्यांना द्यावी.

७४६४

## ३ शास्त्री बापट ( इ. स. १८०४ ते इ. स. १८६५ )

महाराष्ट्रांतील पहिले समाजसुधारक विष्णुशास्त्री बापट हे कोकणांतील नारिंग्रे गांवाहून पुण्यास इ. स. १८३३ मध्यें आले. नारिंग्रे येथें त्यांच्या वडिलांची एक वेदपाठशाळा होती. दरसाल श्रावण मासीं पेशवे सरकारकडून त्यांना त्याप्रीत्यर्थ १०० रु. दक्षिणा मिळत असे. वार्धक्यामुळें वडिलांना स्वतः पुण्यास येणें अशक्य झाल्यानें विष्णुशास्त्री बापट हे पुण्यास कलेक्टरला भेटले व अर्ज केला. तो अर्ज कलेक्टरनें विश्राम बागवाड्यांतील संस्कृत कॉलेज कमिटीकडे रवाना केला व कमिटीनें असें ठरविलें कीं, वरील १०० रु. ची दक्षिणा वडिलांच्यातर्फे विष्णुशास्त्री बापटांचे हवालीं करावी.

विष्णुशास्त्री लहानपणापासून फार हुशार होते. त्यांनीं संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळविलेलें होतें. इ. स. १८३१ ते १८३३ पर्यंत दोन वर्षें सुरतेस आय. एस. लॉ या साहेबाजवळ ते संस्कृतचे पंडित म्हणून होते. ता. १७ आक्टोबर इ. स. १८३३ त वरील साहेबांनीं विष्णुशास्त्र्यांना प्रशस्तिपत्र दिलें तें खालींलप्रमाणें:—

"This is to certify that the bearer Vishnu Shastri Bapat has been in my service for nearly 2 years as a Pandit to asist me in reading Sanskrit. He is a man of respectable family and very good abilities. He is well acquainted with Sanskrit grammar, the Nyaya and Vedantic Systems and the Dharma Shastra and can read and interpret with facility The Puranas, Poems, plays and works on Rhetoric. He speaks and writes his own language with grammatical accuracy and speaks Gujarathi, Hindustani and I believe also Canarese, and have always found him attentive and deligent. He would be well Calculated for a judicial situation."

Surat, 17th October, 1833. —I. S. Law

त्यानंतर मुंबई सरकारचे मुख्य सेक्रेटरी W. H. Wathen यांच्याजवळ मुंबईस विष्णुशास्त्री बापट राहिले. सुप्रसिद्ध " वल्लभी " ताम्रपटांचा अर्थ लावण्यांत त्यांची वाथिन साहेबांना फार मदत झाली. शाळांना उपयुक्त अशीं पुष्कळ पुस्तकें वाथिन साहेबांच्या देखरेखीखालीं त्यांनीं तयार केलीं. याशिवाय " नीतिदर्पण " व इतर पुस्तकें बापटशास्त्रीबुवांनीं स्वतःच्या बुद्धीनें लिहिलेलीं मुंबई सरकारनें छापून प्रसिद्ध केलीं.

ता. १८ मार्च इ. स. १८३८ रोजीं वाथिनसाहेबानें विष्णुशा... त्यांच्या गुणाबद्दल खालीलप्रमाणें सर्टिफिकेट दिलें :—

This is to certify that Vishnu Shastri Bapat was in my employ for some years and that I found him extremely well informed and possessing talents and abilities far above most of his Contemporaries. He is also well-read in all the books of Hindu Science and literature. He is the most im- prejudiced and liberal of most of the Shastrees I have met with He greatly assisted me in deciphering the famous Vallabhi Plates which I could not have accomplished without his assistance. He has also shown himself eager for the im- provement of his fellow Countrymen in drawing up under my direction many small, useful works for schools. In fact I can safely recommend him to any one who wishes to study Sanskrit or to convey European knowledge to the native mind by translation.

W. H. Wathern

18 th March, 1838 Chief Secretary to Government.

कँडीसाहेब इ. स. १८३९ मध्यें विष्णुशास्त्री बापटासंबंधीं खालील उद्गार काढतो :—" Vishnushastri Bapat is a man of remarkable intelligence and has talent for business. He is also a man of impetuons temper. He is an ambitious man and very desirous of being an ammer."

कँडीसाहेब मोल्सवर्थसाहेबाला " इंग्रजी-मराठी " डिक्शनरी तयार करण्याचे कामीं मदत करीत होते. संस्कृत कॉलेजचे सुपरिंटेंडंट म्हणून कँडीची नेमणूक झाल्यावर कॉलेजमध्यें कांहीं सुधारणा घडवून आणण्याचें त्यानें ठरविलें. त्या कामीं आपणास मदत करण्यासाठीं विष्णुशास्त्री बापट यांना माझ्याजवळ ठेवावें अशा आशयाचें पत्र कँडीसाहेबानें वाथिन साहेबाला लिहिलें:—

ई ता. १३ फेब्रुवारी इ. स. १८३७

"Mr. Vishnu Shastri Bapat bears high Character for talent and learning and liberty of mind, and he will prove efficient assistant to me."

त्याप्रमाणें कँडच्या हाताखालीं "Pandit assistant to the Superintendent" या नात्यानें विष्णुशास्त्री बापट काम करूं लागले. त्यांनीं कॉलेज सुधारण्याच्या बाबतींत कँडीसाहेबाला पुष्कळ मदत केली. पुढें ते कॉलेजचे ॲक्टिंग प्रिन्सिपल झाले, त्यावेळीं त्यांचेकडे शिकविण्याचें काम देण्यांत आलें नाहीं. याचें कारण असें कीं, संस्कृत कॉलेजच्या निरनिराळ्या क्लासांतून ( पाठशाळांतून ) निरनिराळे शिक्षक कसे काय काम करीत आहेत हें पहाण्यास त्यांना भरपूर वेळ मिळावा. विष्णुशास्त्री बापटांचा पगार दरमहा ९० रु. होता. एके दिवशीं गोविंदभट वेलणकर यानें विष्णुशास्त्र्याविरुद्ध अशी तक्रार केली कीं, दसऱ्याच्या दिवशीं त्यांनीं मुलांना चोपलें. मुंबई सरकारनें वेलणकरला पत्रद्वारें कळविलें,

" दसऱ्याच्या दिवशीं मारलें नाहीं. सात दिवस अगोदर मारिलें. विष्णुशास्त्र्यांचा स्वभाव तापट आहे. त्यासंबंधीं त्यांना इषारा दिला आहे. "

पुढें सहकाऱ्यांशीं बेबनाव झाल्यामुळें व त्यांच्या तापट स्वभावामुळें विष्णुशास्त्र्यांना तात्पुरतें कमी करण्यांत आलें, इ. स. १८३९ ! त्या सालच्या जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यांचा त्यांचा पगार त्यांना देण्यांत आला नाहीं ! ! त्यांचे जागीं मोरेश्वरशास्त्री साठे यांची नेमणूक ता. २४ सप्टेंबर इ. स. १८३९ रोजीं करण्यांत आली.

मागें सांगितल्याप्रमाणें इ. स. १८२१ त पुण्यास पेशव्यांच्या वाड्यांत संस्कृत कॉलेजची स्थापना झाली. पुढें ९ वर्षांनीं म्हणजे इ. स. १८ स्टीफन्सन या साहेबानें पुण्यास पेशव्यांच्या शुक्रवारवाडा नामक राजवाड्याच्या तालीमखान्यांत एक इंग्रजी शाळा काढली. पुढें इ. स. १८३४ त ईस्डेल या हेडमास्तराचे अधिकाराखालीं इंग्रज सरकारनें एक इंग्रजी शाळा काढली. इ. स. १८४० त मेजर कँडीनें असें सुचविलें कीं, इंग्रजी शिकण्याचा एक वर्ग संस्कृत कॉलेजांत काढावा. कलकत्त्याच्या संस्कृत कॉलेजांत असा एक वर्ग होता. परंतु त्यायोगें खर्च अधिक वाढेल म्हणून असें ठरलें कीं, बुधवार वाड्यांतील ईस्डेलसाहेबाच्या "पूना इंग्लिश स्कूल" मध्यें संस्कृत कॉलेजांतील विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकण्यासाठीं पाठवावें. त्याप्रमाणें इ. स. १८४२ मध्यें संस्कृत कॉलेजांतून स्कॉलरशिपा देऊन आठ विद्यार्थी इंग्रजी शिकण्यासाठीं बुधवारवाड्यांत पाठविण्यांत आले. विश्रामबागवाडा व बुधवारवाडा दोन जवळजवळच्या रस्त्यावर असल्यामुळें इकडून तिकडे जाण्यांत विद्यार्थ्यांना अडचण पडत नसे.

इ. स. १८४९ त सरकारनें पुण्याच्या संस्कृत कॉलेजांत नवीन मुलें परीक्षा घेऊन शिकण्यास घेण्याचें बंद केलें. त्या वेळीं शास्त्री लोकांत खळबळ उडाली. पुणें, सातारा, पंढरपूर वगैरे ठिकाणच्या ५०० शास्त्र्यांनीं सरकारकडे त्याविरुद्ध अर्ज केला. तेव्हां सरकारनें ठरविलें कीं, दरसाल २००० रु. खर्चून नवीन मुलें कॉलेजांत घ्यावींत. परंतु थोडेसें इंग्रजी शिकून तयार झालेले लोक म्हणूं लागले कीं, "शास्त्री–पंडित तयार करून काय करावयाचें आहे?" असें म्हणणाऱ्यांपैकीं एक गोपाळ हरि देशमुख हे होते! त्यांनीं ह्या बाबतींत आपली लेखी सम्मती दिली आहे!

पुढें लवकरच म्हणजे इ. स. १८५२ त विश्रामबागवाड्यांतील "संस्कृत कॉलेज" व बुधवार वाड्यांतील "पूना इंग्लिश स्कूल" हीं दोन्ही एकत्र करण्यांत आलीं व दोघांना मिळून "पूना कॉलेज" असें नांव पडलें. हें नांव इ. स. १८६७ तहि चालूं होतें व नंतर त्याला "डेक्कन कॉलेज" हें नांव पडलें. त्या सालीं त्या कॉलेजचा प्रिन्सिपल वर्डस्वर्थ हा होता. तो त्या सालच्या आपल्या रिपोर्टांत म्हणतो.

"We are anxiously looking forward to the time when we shall move into the new Deccan College and commence the experiment of a more regular collegiate life."

"पूना कॉलेज" हें नांव दिल्यावर संस्कृत कॉलेजांत संस्कृत विषय हा अनेक विषयांपैकीं एक विषय इतकेंच त्याचें महत्त्व राहिलें! मुख्य शास्त्री म्हणून नेमणूक करण्याचें बंद पडलें.

ता. ३१ डिसेंबर इ. स. १८५२ रोजीं पूना कॉलेजच्या पटावर एकूण ४९७ विद्यार्थी होते ते पुढीलप्रमाणें :—

| अनुक्रम | खातें | सरकारी मदत घेणारे | फी देणारे | नादार | बेरीज |
|---|---|---|---|---|---|
| १ | संस्कृत | १० | १० | ११२ | १३२ |
| २ | इंग्रजी | ३५ | १२८ | १७९ | ३४३ |
| ३ | इतर | २० | ... | ३ | २३ |
| | बेरीज | ६५ | १३८ | २९४ | ४९७ |

१ जानेवारी इ. स. १८५३

१ प्रिन्सिपल--मेजर कँडी

२ देशी वाङ्मयाचे हंगामी ॲसिस्टंट प्रोफेसर—कृष्णशास्त्री चिपळूणकर

३ प्रोफेसर ऑफ इंग्लिश लिटरेचर...?

४ देशी वाङ्मयाचे प्रोफेसर...?

५ प्रोफेसर ऑफ मॅथॅमॅटिक्स व नॅचरल फिलॉसॉफी...?

६ नॅचरल फिलॉसॉफी मराठींतून शिकविणारे प्रोफेसर...?

७ संस्कृत व अलंकारचे प्रोफेसर—नारायणशास्त्री अभ्यंकर

८ तर्कशास्त्राचे प्रोफेसर...?

९ कायद्याचे प्रोफेसर...?

१० व्याकरणाचे प्रोफेसर...?

# दक्षिणा.

मराठी राज्याच्या उत्पन्नांतून त्या राज्याचा सेनापति दाभाडे ह्यानें दक्षिणा वांटण्याचा मूळ प्रघात पाडला. दाभाडे घराण्यास उतरती कळा लागल्यावर व पेशव्यांचा उदय झाल्यावर पेशव्यांनीं " दक्षिणा " वांटण्याचा प्रघात चालू ठेवला.

पुण्यास पेशवाईंत दरसाल ५०००० रुपये विद्वान् व गरीब ब्राह्मणांना दान देण्यांत येत असत. हिंदुशास्त्र व हिंदुवाङ्मय यांना उत्तेजन देण्याची ही एक युक्ति होती. पेशव्यांकडून दरसाल " दक्षिणा " मिळविणें ही एक ज्ञानाची व मानाची गोष्ट देशांतील सर्व ब्राह्मण मानूं लागले. शास्त्रें व वेद शिकून त्यांत पारंगतता मिळवून आपलें ज्ञान पुण्यास "श्रावण" मासीं पेशवे, त्यांचे दरबारीं, व पेशव्यांनीं नेमलेल्या विद्वान परीक्षकांच्या समितीपुढें दर्शवून "दक्षिणा" मिळविण्याबाबत ब्राह्मणांत चढाओढ लागली. दक्षिणेची रक्कम फार मोठी होती असें नाहीं. परंतु ती मिळविणें हा एक मान होता. दक्षिणा मिळविणाऱ्या शास्त्रीबुवास ती त्याच्या हयातीपर्यंत मिळत असे, ती त्याच्या वारसांना मिळत नसे असे दिसतें. पुढें पेशवाई जाऊन ब्रिटिश राज्यास हिंदुस्थानांत सुरुवात झाली त्या वेळीं मुंबईचे गव्हर्नर एलफिन्स्टन यांनीं दक्षिणा पुढें चालूं ठेविली; परंतु रक्कम कमी केली! ज्ञान व दान ह्या दोहोंचा मिलाफ त्या ठिकाणीं असल्यामुळें व हिंदुस्तानच्या लोकांना " दक्षिणा " मिळविणें आवडत असल्यामुळें ब्रिटिश सरकारनें ती चालूं ठेविली. त्यानें दक्षिणेची रक्कम ५०००० रु. ठरविली, परंतु पुढें ती ३०००० रु. वर खालीं आणली! इ. स. १८२१ त पुण्यास विश्रामबागवाड्यांत संस्कृत कॉलेजची स्थापन झाली त्या वेळीं त्याच्या खर्चाप्रीत्यर्थ २०००० रु. मंजूर झाले. त्याला "संस्कृत कॉलेज फंड" असें नांव दिलें. बाकीचे ३०,००० रु. "दक्षिणा" या नांवाखालीं दरसाल वांटण्यासाठीं, इ. स. १८३६ पर्यंत म्हणजे १५ वर्षें, पुण्याच्या शास्त्री मंडळाच्या हवालीं करण्यांत आले होते.

इ. स. १८३६ नंतर हें शास्त्री मंडळ रद्द करण्यांत आलें व " दक्षिणा " वांटपासंबंधीं सर्व व्यवस्था महाराष्ट्रांतील सरदारांच्या ब्रिटिश "एजंटा" कडे देण्यांत आली. इ. स. १८३७ त मेजर कँडी याला संस्कृत कॉलेजचा व्यवस्थापक नेमिलें, तेव्हां त्याचा पगार " दक्षिणा फंडांतून " द्यावा असें ठरलें.

दक्षिणा वांटपासंबंधीं कांहीं आंकडे देतों:--

आ(क्र) ... दि ...
क्रमांक ... नों: दि: ...

| इसवी सन | दक्षिणा किती वाटली |
|---|---|
| | रु. आ. पै. |
| १८२१ | ४३००० – ० – ० |
| १८२२ | ३७४५१ –१० – ९ |
| १८२३ | ३६१८० – २ – २ |
| १८२९ | ३९००० – ० – ० |
| १८३४ | ३०००० – ० – ० |
| १८४९ | २३७६१ –१० – ६ |

## पुण्याच्या विश्रामबागवाड्यांत स्थापन झालेल्या संस्कृत कॉलेजशीं कोणत्याहि कारणानें संबंध आलेल्या व इतर कांहीं सद्गृहस्थांची यादी

१ धि राइट ऑनरेबल सर रॉबर्ट ग्रॅन्ट, मुंबईचे गव्हर्नर
२ मेजर थॉमस कँडी, सुपरिंटेंडंट संस्कृत कॉलेज इ. स. १८३७ ते १८५२. त्याचे प्रिन्सिपल इ. स. १८५३ पासून.
३ ऑलिवर, गणिताचे प्रोफेसर, एलफिन्स्टन कॉलेज, मुंबई
४ रॉबर्टसन, पुण्याचे कलेक्टर, इ. स. १८३४
५ चॅप्लिन, दक्कनचे कमिशनर, संस्कृत कॉलेजचे संस्थापक
६ विल्किन्सन, ईस्ट इंडिया कंपनीचे भोपाळ येथील एजंट
७ लोकहितवादी—गोपाळ हरि देशमुख
८ परशरामपंत गोडबोले, सं. कॉ. च्या लियो प्रेसचे सुपरिंटेंडंट इ. इ. १८३९
९ कृष्णशास्त्री चिपळूणकर, ॲक्टिंग प्रोफेसर, पूना कॉलेज, इ. स. १८५३
१० आबा गोखले, सं कॉ. सुधारणा कमिटीचे सभासद इ. स. १८३४
११ ईस्डेल, बुधवारवाड्यांतील सरकारी इंग्रजी शाळेचे हेडमास्तर, पुणें इ. स. १८३४

१२ विष्णुशास्त्री बापट, हिंदुस्थानांतील पहिले समाजसुधारक, जन्म इ. १८०४; मृत्यु इ. स. १८६५

१३ रामचंद्रशास्त्री जानवेकर

१४ राघवाचार्य रामानुज सं. कॉ. चे पहिले प्रिन्सिपल

१५ गोविंदशास्त्री पाध्ये

१६ धोंडशास्त्री देगवेकर

१७ मोरेश्वरशास्त्री साठे

१८ चिंतामणशास्त्री दीक्षित, आपटे

१९ चिंतामणशास्त्री लिमये

२० गोविंदाचार्य

२१ नारायणाचार्य

२२ अनंताचार्य

२३ सखारामशास्त्री नगरकर

२४ बाळ गंगाधर शास्त्री

२५ "भाऊ" डॉक्टर

२६ चिन्हाचार्य

२७ नारायणशास्त्री

२८ बाळकृष्णशास्त्री

२९ बापूजी गणेश, ॲक्टिंग मामलेदार, पुणें, इ. स. १८३४

३० महादेवशास्त्री जोशी, आर्लीबागकर, खगोलशास्त्राचे प्रोफेसर, सं. कॉ. शा. प्रोफे. पुणें, सेवानिवृत्त, इ. स. १८३९

३१ मोरेश्वर ऊर्फ दादा जोशी, ज्योतिषशास्त्राचे प्रोफेसर, सं कॉलेज इ. स. १८४० पासून

३२ वासुदेवशास्त्री

३३ नरसिंहाचार्य ओक

३४ रघुनाथशास्त्री पर्वते, न्यायशास्त्राचे प्रोफेसर, सं. कॉ. पुणें इ. स. १८४०

३५ नारायणशास्त्री अभ्यंकर

येणेंप्रमाणें इ. स. १८२१ ते इ. स. १८६७ पर्यंतचा, म्हणजे संस्कृत कॉलेजची स्थापना विश्रामबागवाड्यांत झाल्यापासून त्याचें रूपांतर व प्रस्थापना शहराबाहेर डेक्कन कॉलेजांत होईपर्यंतचा हा इतिहास थोडक्यांत मी वरीलप्रमाणें दिलेला आहे.

# परिशिष्ट

पुण्याच्या विश्रामबागवाड्यांत इ. स. १८२१ त स्थापन झालेल्या संस्कृत कॉलेजांत निरनिराळया विषयांवर नेमिलेलीं क्रमिक पुस्तकें (Text-Books) खालीलप्रमाणें होतीं :—

| क्रमांक | विषय | नेमलेलीं पुस्तकें |
|---|---|---|
| १ | न्याय किंवा तर्कशास्त्र (Logic) | १ गदाधरी अवयव<br>२ व्युत्पात्ति<br>३ गदाधरी सुव्यभिचार<br>४ सत्पुति प्रकाश ग्रंथ<br>५ प्रामाण्यवाद<br>६ गागादेशी<br>७ गदाधरि चतुर्दश लक्षाणि<br>८ सामान्य निरुक्ति<br>९ दिनकरि<br>१० मथुरानाथि<br>११ तर्कसंग्रह मुक्तावलि |
| २ | खगोल शास्त्र (Astro-mony) | १ गुरुलाघव<br>२ लीलावति<br>३ बीजगणित<br>४ सिद्धान्त<br>५ शिरोमणि गोलाध्याय<br>६ गुणाध्याय<br>७ ज्योतिषशास्त्र, सिद्धान्त, पुराणें, व कोपर्निकसचे ग्रंथ यांत ज्योतिर्विषयक येणाऱ्या विचारांची तुलना, सुबाजी बापूकृत |

| क्रमांक | विषय | नेमलेलीं पुस्तकें |
| --- | --- | --- |
| | | ८ लघु चिंतामणि<br>९ सूर्यसिद्धान्त<br>१० खगोल शास्त्रावर मॅक लेनन साहेबानें लिहिलेल्या इंग्रजी पुस्तकाचें भाषांतर. |
| ३ | धर्मशास्त्र (Law) | १ मिताक्षरी<br>२ व्यवहार मयूख<br>३ मनुस्मृति<br>४ निर्णय सिंधु |
| ४ | व्याकरण (Grammar) | १ मनोरमा<br>२ सुबोधरत्न<br>३ कौस्तुभ<br>४ कौमुदि |
| ५ | अलंकार (Rhetoric) | १ किरात<br>२ माघ<br>३ भारत चंपु<br>४ वेणीसंहार ( नाटक )<br>५ प्रतापरुद्र<br>६ निषध<br>७ रामायण चंपु<br>८ रघुवंश<br>९ कुमार |
| ६ | आयुर्वेद (Medicine) | १ माधव निदान<br>२ वाग्भटाध्याय |

| क्रमांक | विषय | नेमलेलीं पुस्तकें |
|---|---|---|
| | | ३ शार्ङ्गधर<br>४ वैद्यजीवन<br>५ शरीराध्याय<br>६ भग्नहाडावर (fractures) मॅकलेनकृत इंग्रजी पुस्तकाचें मराठी भाषांतर. |

टीप :--वीर मित्रोदय व्यवहार व कुलुकभट्टी मनुस्मृतीची व्याख्या ( समग्र ) हीं अत्यंत महत्त्वाचीं पुस्तकें इ. स. १८३५ त पुणें शहरांत दुर्मिळ झालीं होतीं तीं संस्कृत कॉलेजच्या लायब्ररींतहि नव्हतीं !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 20916 दि. 6/7/61
क्रमांक 645 नों. दि. 20/7/55

REFBK-0007467

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
6467

हायस्कुलांतील इंग्रजी ६ वी व ७ वी यांत
असणाऱ्या विद्यार्थ्यांनो व विद्यार्थिनींनो !

तुम्हांस वार्षिक परीक्षेंत व एस्. एस्. सर्टिफिकेट परीक्षेंत पास
व्हावयाचें आहे ना ?

तर मग २०० ब शनिवार पेठ, पुणें २
या घरमालकास भेटा किंवा लिहा.
तुम्हांस सुयशाचा मार्ग
ते दाखवितील.

★